**रे.दि.मू.नं. १९/२०११ मधील नि. ७८ खालील आदेश**
**( सिताराम मदने विरूध्द जगु मदने तर्फे मयत वारस )**
**(आदेश पारीत दि. २५/०२/२०२०)**

नि. ७८ वरील प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. १अ ते १क यास कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल केले. वादी यांनी सदरचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

२. अर्ज, व दस्तऐवज याचे अवलोकन केले. नि. ७८ मध्ये नमूद केलेली कारणे विचारात घेता वादी व प्रतिवादी यांचेमधील अंतिम वाद निकाली काढणेकरिता प्रतिवादी नं. १अ ते १क यास कैफियत दाखल करणेस संधी देणे न्यायोचीत वाटते. सबब प्रतिवादी नं. १अ ते १क यास कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफी देणे न्यायोतीत वाटते व प्रतिवादी नं. १ यास कैफियत व म्हणणे दाखल करणेस संधी देणे योग्य वाटते. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. ७८ चा अर्ज रक्कम रूपये ५००/— चे कॉस्टवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी नं. १अ ते १क यास कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करणेत येतो.

३. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

**दि. २५/०२/२०२०**

**( अ.ब.चव्हाण )**
**सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**खंडाळा.**